पनवेल(प्रतिनिधी) जनहितासाठी धडपड करणाऱ्याला लोकमाणसामध्ये माणुसकीची श्रीमंती असते आणि ती माणुसकीची श्रीमंती आमदार प्रशांत ठाकूर यांनी विकासकामांच्या माध्यमातून मिळविली आहे, असे स्पष्ट प्रतिपादन राज्याचे महसूल व खार मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आज(दि.०६) पनवेल येथील प्रशासकीय भवनाच्या भुमीपूजनाप्रसंगी केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नाने राज्य शासनाच्या माध्यमातून ०९ कोटी ८१ लाख रूपये खर्च करून पनवेल येथे साकारल्या जाणाऱ्या मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन नामदार बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते झाले, त्यानंतर आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहात झालेल्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ना.थोरात बोलत होते.

नामदार थोरात पुढे म्हणाले की, आमदार प्रशांत ठाकूर यांनी माझ्याशी संवाद साधताना दिलेल्या माहितीनुसार या प्रशासकीय इमारतीच्या बांधणीमध्ये आणखी चटई क्षेत्र बाकी असून या उर्वरित चटई क्षेत्राच्या माध्यमातून आणखी दोन मजली इमारतीचे वांधकाम उभारणे शक्य आहे, त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या सुचनेनुसार त्यासंदर्भातील प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी तातडीने सादर करावा, याकामी आचारसंहिता लागण्यापूर्वी बांधकाम व फर्निचरसाठी १० कोटी रूपयांची तरतूद करून देण्यात येईल, अशी ग्वाहीही ना.थोरात यांनी यावेळी दिली. ना.थोरात यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्याचा आपल्या भाषणातून सतत गौरव केला. पनवेलचा विकास मोठया प्रमाणात झाला पाहिजे, यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांची सातत्याने धडपड सुरू असते. एक तरूण कार्यकर्ता म्हणून आमदार प्रशांत ठाकूर हे पनवेल मतदार संघाची मनापासून सेवा करत आहेत. दुरदृष्टी लाभलेल्या आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्न व पाठपुराव्यातूनच पनवेलमधील हे प्रशासकीय भवन उभे राहत आहे. पाच वर्षात जेवढी त्यांनी कामे केली आहेत, त्याच्या पुढे जावून पुढील २५ वर्षे अशाच प्रकारे कामे करून जनतेची अखंडपणे सेवा ते करतील, असेही ना.थोरात म्हणाले. साळस, विनम्र, प्रामाणिक आणि मनापासून काम करण्याची इच्छाशक्ती व विकासाचा टॉवर उभारणारा लोकप्रतिनिधी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या रूपाने पनवेलला मिळाला आहे, असेही त्यांनी बोलताना आवर्जुन नमूद केले.

नामदार थोरात यांनी पुढे बोलताना राज्य शासनाच्या उपक्रमांची माहिती देत सांगितले की, आता नागरिकांना लाईनमध्ये राहण्याची गरज लागणार नाही, ईन लाईनची प्रतिक्षा संपली असून महसूल विभागाच्या माध्यमातून सर्व कामे 'ऑनलाईन' करण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. कॉम्प्युटराईज्ड सातबारा, अधिवास, फेरफार अदालत, चावडी वाचन, असे विविध उपक्रम महसूल विभागाच्यावतीने राबवित असतानाच सुवर्ण राजस्व अभियानांतर्गत लोकांची सहजपणे सेवा केली जात असून शासनाचा कारभार अधिक पारदर्शकपणे आणि जलदगतीने व्हावा यासाठी राज्य शासन कटीब्ध्द आहे, असेही नामदार बाळासाहेब थोरात यांनी स्पष्ट केले. सुवर्ण राजस्व अभियानांतर्गत पहिल्या वर्षी शिबीरांच्या माध्यमातून ४२ लाख नागरिकांना विविध शासकीय दाखल्यांचे वाटप करण्यात आले होते, याच अंतर्गत आत्तापर्यंत ०१ कोटी ६५ लाख जणांना दाखले वितरीत करण्यात आली असून याची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदविण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणातून राज्याचे महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचे आभार व्यक्त केले. त्यांनी केलेल्या सहकार्यामुळे पनवेलमध्ये मध्यवर्ती प्रशासकीय भवन उभे राहत असल्याचे सांगून हे भवन पनवेलच्या इतिहासातील क्रांतीकारक पाऊल असल्याचेही आ.ठाकूर यांनी म्हंटले. ते पुढे म्हणाले की, कोकण पट्टयापासुन ते विदर्भाच्या शेवटच्या टोकापर्यंत वातावरण आणि परिसर रचनेनुसार नैसर्गिक परिस्थिती वेगवेगळी असली तरी राज्यातील या संपूर्ण विभागांना न्याय देण्याचे काम व राज्याला पुढे नेण्याचे काम कॉग्रेस आघाडी सरकार कडून होत आहे. महसूल विभागाच्या माध्यमातून नामदार बाळासाहेब थोरात यांनी अनेक चांगल्या निर्णयांची मालिका सुरू ठेवून नागरिकांना दिलासा देण्याचे काम केले आहे. 'ड' सत्ता, कुळकायदा, ३२ ग, एन.ए., जीर्ण इमारतींना रि डेव्हलेपमेंट, महामुंबई एसईझेड अशा संदर्भातील ठोस निर्णय घेवून शासन शेतकरी, प्रकल्पग्रस्तांच्या पाठिशी ठामपणे उभा आहे, त्यांच्या बाजूने सकारात्मक निर्णय घेत आहे, हे कॉग्रेस आघाडी सरकारने दाखवून दिले आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून लोकांना चांगली सेवा देण्याचे काम होत असून महाराष्ट्राचा विकास अधिक गतीने होत आहे, याबद्दल समस्त पनवेलकरांच्यावतीने राज्य शासनाचे आभार व्यक्त करत आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

यावेळी रायगडचे जिल्हाधिकारी सुमंत भांगे यांनी प्रशासकीय भवनासंदर्भात आपल्या प्रास्ताविकातून माहिती दिली. ४२ हजार चौरस मीटर जागेवर उभारण्यात येणारी ही इमारत पार्किंग अधिक तीन मजले अशी असून तहसील, वन, शहर पोलीस ठाणे, दुय्यम निबंधक, उपकोषागार आदी कार्यालये या प्रशासकीय भवनात असणार आहेत, असे भांगे यांनी सांगितले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून आणि पाठपुराव्यातून प्रशासकीय भवन उभे राहत असून त्यांचे विशेष आभार मानतो असे कोकण विभागीय आयुक्त राधेश्याम मोपलवार यांनी यावेळी म्हंटले. या कार्यक्रमात लाभार्थींना नामदार बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते कुळकायदा, ३२ म, प्रकल्पग्रस्त, आदिवासी, जमीन वर्गीकरण आदी विविध शासकीय दाखले प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कोकण म्हाडाचे अध्यक्ष माणिकराव जगताप, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे उपाध्यक्ष मुश्ताक अंतुले, रायगड जिल्हा अध्यक्ष तथा सिडकोचे संचालक आर.सी.घरत, कामगार नेते श्याम म्हात्रे, नगराध्यक्षा चारूशिला घरत, कोकण विभागीय उपायुक्त कैलास जाधव, अप्पर जिल्हाधिकारी प्रविण शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंडळाचे रायगड विभागीय अधिक्षक अभियंता एम.एम.सुरकुटवार, प्रांताधिकारी सुदाम परदेशी, तहसिलदार पवन चांडक, उपनगराध्यक्ष मदन कोळी, इंटकचे प्रदेश कार्याध्यक्ष महेंद्र घरत, प्रदेश कॉंग्रेसचे सदस्य अरूणशेठ भगत, जिल्हा परिषदेतील गटनेते राजेंद्र पाटील, माजी उपनगराध्यक्ष सईद मुल्ला, पनवेल शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष जयंत पगडे, कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, नगरपालिकेतील गटनेते अनिल भगत, शिक्षण मंडळाचे सभापती वाय.टी.देशमुख, बांधकाम सभापती राजू सोनी, पाणी पुरवठा सभापती सुभाष भुजबळ, महिला व बाल कल्याण सभापती नीता माळी, शिक्षण सभापती एकनाथ गायकवाड, शहर कॉंग्रेसचे प्रवक्ते शशिकांत बांदोडकर, महिला कॉंग्रेसच्या जिल्हाध्यक्षा वासंती उमरोठकर, तालुकाध्यक्षा ॲड.आशा भगत, शहर अध्यक्षा वर्षा नाईक, कार्याध्यक्षा रत्नप्रभा घरत, विधानसभा महिला प्रभारी दर्शना भोईर यांच्यासह विविध तालुक्यांचे अध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.